कोल्हापुर येथील शाहुपुरी पोलीस स्टेशन गु.र.क्र.३९७/२०१५ (सत्र न्यायालयीन प्रकरण क्र.४७/२०१६) या गुन्हयामधून उद्भवणा-या खटल्यामध्ये मा.सत्र न्यायालयात शासनाच्या वतीने कामकाज पाहण्याकरीता, नियुक्त केलेल्या विशेष सरकारी अभियोक्ता ॲड.श्री.प्रकाश हिलगे यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०७१६/प्र.क्र.१८९/पोल-१०

गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मुंबई-४०० ०३२

दिनांक :१२ एप्रिल ,२०१८

<u>संदर्भ -:</u> शासन अधिसूचना,विधी व न्याय विभाग क्र.एसपीपी२०१७/यु.ओ.आर.१०/डी-१४, दिनांक ०३ मार्च,२०१७.

शासन निर्णय : -

कोल्हापुर येथील शाहुपुरी पोलीस स्टेशन गु.र.क्र.३९७/२०१५ (सत्र न्यायालयीन प्रकरण क्र.४७/२०१६) या गुन्हयामधून उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड.श्री.प्रकाश हिलगे यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दि.०३.०३.२०१७ च्या अधिसूचनेन्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे .सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.प्रकाश हिलगे यांना खालीलप्रमाणे व्यावसायीक फी अदा करण्यास या शासन मान्यता देत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी रु.(१०,००० -/(रूपये दहा हजार फक्त)

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी .तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.प्रकाश हिलगे यांना अपरिणामकारक सुनावणी फी अथवा अन्य कोणतेही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३१/१७/व्यय-७, दिनांक १०.०४.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१२१२१६३९९८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2018.04.12 12:17:42 +05'30'

(दिनेश आ. सस्ते)

कार्यासन अधिकारी,गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस अधीक्षक, कोल्हापुर.
३. महालेखापाल१- (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. कोषागार अधिकारी, कोल्हापुर.
६. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
७. ॲड .श्री .प्रकाश हिलगे,हिरण्य गर्भ, प्लॉट नं.१, समरकमल, सम्राटनगर, कोल्हापुर, जि.कोल्हापुर.
८. विधी व न्याय विभाग (का-१४), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (पोल-१०).